International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 March – April 2023

# आधुनिक भारताच्या उभारणीत डॉबाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान.

**प्रा .महादेव श्रावण गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापकइतिहास विभाग , सांगोला महाविद्यालयसांगोला,
*Corresponding Author* - प्रा .महादेव श्रावण गायकवाड
Email- mahadeogaikwad456@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7747786

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयी केलेले चिंतन आणि दूरदृष्टी आजही अवलंबने अत्यंत गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगद्विख्यात अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी शेतीच्या प्रश्नाविषयी मुलभूत अभ्यास केलेला होता. शेतीचा नेमका प्रश्न काय आणि त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजेत, याविषयी त्यांनी केलेली मांडणी आजही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आहे. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी शेतीसाठी लागणारा खर्च सरकारने उचलला पाहिजे, त्यासाठीची रक्कम शेतकऱ्यांना द्यायला पाहिजे, अशी सूचना केली होती. डॉ %१०० खावर:त्यांच्या दु,शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंबेडकरांनी.इलाज केला आहेपण . आंबेडकर यांना अपेक्षित .कृषी विज्ञान व तंत्रज्ञानाची सांगड घालून डॉ.इलाजाबरोबर पथ्ये पाळणेही तितकेच गरजेचे आहे असणारा कृषी विकस साधता येईल

**भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय :**

भारतीय शेतीचा विकास न होण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यामध्ये अतिशय महत्त्वाचा म्हणजे, धारण क्षेत्र संदर्भाने उपस्थित होणारे प्रश्न होत. डॉ. आंबेडकरांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय या प्रबंधात त्याची विस्ताराने चर्चा केली आहे. त्यांनी जमिनीच्या विखंडनाच्या कारणांची अतिशय मार्मिक मीमांसा केली आहे. त्यांचे म्हणणे आहे, की धारण क्षेत्राचे विखंडन हे मुख्यत्वे दोन कारणांमुळे होते. पहिले म्हणजे वारसाहक्क आणि दुसरे म्हणजे हस्तांतरण. सत्ता, संपत्ती, दमन आणि महत्त्वाकांक्षेमुळे एखादी व्यक्ती इतरांच्या मालकीची जमीन गिळंकृत करते; त्यामुळे विखंडन होते. विशेषत: दारिद्र्य, दुष्काळ, व्यसनाधीनता यांतून होणारी जमीन विक्री व त्यामुळे होणारे विखंडन महत्त्वाचेच. अज्ञान, कलह आणि स्थलांतर ही विखंडनास कारणीभूत आहेत. जमिनीचे लहान लहान तुकडे होत गेले; त्यामुळे शेत जमिनीतून आवश्यक उत्पन्न काढता येत नाही. त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासंबंधी त्यांनी विचार केलेला दिसून येतो. त्यांचे म्हणणे आहे, की औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय कृषी क्षेत्रावरील लोकसंख्येचा अतिरिक्त भार कमी होणार नाही. त्याबरोबरच भारतीय शेतीची उत्पादनक्षमता वाढावी,

म्हणून शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. देशातील ८० टक्के जनता शेतीवर उदरनिर्वाह करत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा लक्षात घेऊन शेतकऱ्यांना भांडवल पुरवावे, अशी संकल्पना बाबासाहेबांनी मांडली होती. शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, कसदार बियाणे, उत्तम खते (Machinery, hard seeds, good fertilizers) देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे बाबासाहेबांनी ठासून सांगितले होते.शेतीसाठी लागणारी अवजारे आधुनिक पाहिजेत, पारंपरिक पद्धतीने केलेली शेती कधीच फायदेशीर ठरणार नाही, आधुनिकीकरणासाठी जमिनीचे छोटे-छोटे तुकडे नाही तर एकत्रिकरण होणे आवश्यक आहे. शेतीला दर्जेदार बियाण्याची गरज आहे ही त्रिसूत्री शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक असल्याचे बाबासाहेबांनी त्या वेळेस सांगितले होते

**खोती पद्धतीचा अंत :**

स्वातंत्र्यपूर्व काळात कोकणात खोती पद्धती प्रचलित होती. खोती पद्धती म्हणजे खाजगी सावकारी असते .बाबासाहेबांनी खोती पद्धती नष्ट करण्यासाठी 17 सप्टेंबर 1937 ला विधानसभेत विधेयक मांडले .बाबासाहेबांनी खोती पद्धती कायमची नष्ट करण्याकरता अनेक पातळ्यांवरती प्रयत्न केले .याकामी बाबासाहेबांना अनंतराव चित्रे आणि सुरवात टिपणीस यांची मदत झाली

.चित्रे आणि टिपणीस यांच्यावरती खटले दाखल झाले त्यावेळी बाबासाहेब स्वतः त्यांच्यासाठी न्यायालयात उभे राहिले. आणि युक्तिवाद केला .बाबासाहेबांच्या विचारातून अजून एक अमूल्य विचार समोर येतो आणि तो शेतीसाठी खूप महत्त्वाचा आहे. तो विचार म्हणजे बाबासाहेबांनी त्याकाळी मांडलेला सामुदायिक शेती विचार. सामुदायिक शेती केल्यानंतर शेतकऱ्यांना बरे चे फायदे होतील आणि कमी श्रमात अधिकाधिक उत्पन्न मिळेल हा त्यांचा हेतू होता

**आर्थिक विकास धोरण**

डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, ‘पुनर्बाधणी आणि पुनर्वसन योजना १९४२-४६’ तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षकि योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातींविषयीचे धोरण आणि महत्त्वाचे म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते. आजही त्या कामगारविषयक धोरणाचा आधार घेतला जातो, कोलकात्यात पहिले रोजगार – विनिमय केंद्र सुरू झाले, तेही याच धोरणामुळे. अनुसूचित जातींसाठी सरकारी नोकऱ्या व शिक्षणसंधींमध्ये आरक्षण (१९४३) हे निर्णय त्यांच्या धोरणांमुळे झाले. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या पाणी आणि वीजविषयक धोरणातून झाली. दामोदर, हिराकुड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाटबंधारे विकास हे या धोरणामुळे मार्गी लागले. वास्तविक, केंद्र सरकारचे पाणी आणि वीजविषयक आद्य धोरणकत्रे असे रास्त श्रेय डॉ. आंबेडकर यांना मिळायला हवे. एकटय़ा व्यक्तीचे इतके मोठे योगदान, हा राष्ट्रनिर्माणासाठी मोठाच सहयोग आहे. राष्ट्रवाद, देशप्रेम यांची उच्च पातळी गाठल्याखेरीज आणि प्रामाणिकपणा असल्याखेरीज इतके मोठे काम होत नसते. देशातील साऱ्या वंचितांसाठी तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानायक आहेतच.

**जलसिंचन :**

शेतीविकासासाठी पाणी आणि वीज या दोनच गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेतया १९४६ ते १९४२ . काळात केंद्र सरकारने जी युद्धोत्तर पुनर्निर्माण योजना अमलात आणली, त्यासाठी जे मंत्रिमंडळ स्थापन केले त्याचे बाबासाहेब सभासद होते या आर्थिक योजनेचे .उद्दिष्ट व भूमिका निश्चित करण्याचे काम बाबासाहेबांनी केलेया . योजनेत बाबासाहेबांनी ज्या जलधोरण आणि विद्युत प्रकल्पांची योजना मांडली त्या योजनेला स्वातंत्र्यानंतरच्या नंतर १९४८ पहिल्या पंचवार्षिक योजनेत अग्रक्रम देऊन या अर्थाने बाबासा .त्यांना मंजुरी मिळालीहेब आंबेडकर हे भारताच्या जल आणि विद्युत निर्मितीचे प्रणेते आहेतबिहार . आणि बंगाल या दोन राज्यांना जोडणाऱ्या दामोदर नदीचे विपरीत रूप पाहून या नदीवर धरण बांधण्याचा धाडसी कारण ही नदी .निर्णय बाबासाहेबांनी घेतला होता रमध्ये जमिनीची झीज करतेबिहा, तर पश्चिम बंगालमध्ये पुराने थैमान घालतेया नैसर्गिक आपत्तीचा सामना कसा . करायचा, या नदीचे पाणी नियंत्रित करून शेतीचा विकास कसा करता येईल, यासाठी बाबासाहेबांनी जे अहोरात्र कष्ट घेतले त्याला तोड नाही .‘दामोदर खोरे’ प्रकल्पानंतर बाबासाहेबांनी ओरिसातील महानदीवर ‘हिराकुंड’ धरण बांधून ओरिसातील जनतेला महानदीच्या पुरापासून संरक्षण दिलेच्या दरम्यान मध्य १९४५ याबरोबरच त्यांनी . प्रदेशात वाहत जाऊन गंगेला मिळणाऱ्या सोन नदीवर जल आणि विद्युत धोरणांमागे .बहुउद्देशीय प्रकल्प उभा केला .स्वतंत्र अशी भूमिका होती बाबासाहेबांची

**वीज :**

डॉ .विजय खरे यांनी न्याय, वित्त, जल, विद्युत आणि संरक्षण या अनुषंगाने अत्यंत सखोल संशोधन करून बाबासाहेबांच्या प्रशासकीय व्यक्तिमत्त्वावर ग्रंथरूपाने प्रकाश टाकला आहेया काळात १९४६ ते १९४२ . .द्रीय मंत्री होतेबाबासाहेब जल व विद्युत विभागाचे कें मध्यवर्ती सरकारच्या काळात भारताच्या नियोजन विकासात बाबासाहेबांनी जे महत्त्वपूर्ण काम केले त्याचे दूरगामी परिणाम आज आपल्याला दिसत आहेत . भारताच्या वि‍कासात शेतीविकासाचे महत्त्व बाबासाहेब जाणून होते. १९४१ साली भारतात वीज आयोग स्थापन केलाबासाहेबांकडे ऊर्जाखातेही देण्यात साली बा १९४२ . " .आलेबाबासाहेबांनी वीजनिर्मितीच्या आणि तिच्या वितरणाच्या अनेक बारकाव्यांचा अभ्यास करून केंद्रीय पातळीवर जलविद्युत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी १९४४ साली ऊर्जा मंडळाची स्थापना केलीया आयोगामार्फत . ण निर्माण केलेबाबासाहेबांनी जे विद्युत धोर, त्यात विजेचे उत्पादन, पुरवठा व राष्ट्रीयीकरण करणे, विजेचे मूल्य निश्चित करणे व ऊर्जा विकासासाठी तांत्रिक प्रशिक्षण देणे यासारखे महत्त्वाचे निर्णय घेऊन ऊर्जाविकासात जे राष्ट्रीय योगदान दिले त्या योगदानावर आज आपल्या विकासाची धुरा उभी आहे, ' असे डॉ .थोरात यांनी म्हटले आहे . पंतप्रधान नेहरू यांनी धरणांच्या विकासाचे जे लोकप्रिय धोरण राबविले त्याची पायाभरणी बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व काळात केली ह‍ोतीशेतीविकासात महात्मा . फुलेंनी सांगितलेली जलनीती ही गोष्ट बाबासाहेबांच्या ती हे वेगळे सांगण्याची गरज आर्थिक विचारांचा गाभा हो नाही

**समारोप :** बाबासाहेबांच्या हातात सत्ता होती, विचारात विद्वत्ता होती, वाणीत प्रखरता होती आणि कार्यात प्रचंड गती होती या .सर्वांचा पुरेपूर उपयोग करून बाबासाहेबांनी भारतातल्या बळीराजाला संविधानाच्या रूपाने जो आधार दिला त्याला तोड नाहीराज्यघटनेच्या पानापानात . पददलित, अस्पृश्य, स्त्रिया, शेतकऱ्यांच्या सामाजिक न्यायाच्या कहाण्या बाबासाहेबांनी प्रकाशमान केल्या आहेत . एक महामानव शेतकऱ्यांचे दुःख मांडत होता, तर दुसरा महानायक शेतकऱ्यांच्या दुःखमुक्तीचे मार्ग कृतीत आणत होतादोन्ही महानायक शेतकऱ्यांचे कैवारी या अर्थाने हे . होते, तर बाबासाहेब हे शेतकऱ्यांचे उद्धारक होते, असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल.

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते, की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक चिंतन किती मूलगामी होते. प्रागतिक चळवळींना बळ देत असताना, शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणिवेतून ते पाहतात. शेतीची उत्पादनक्षमता वाढावी, म्हणून शेत जमिनीचे सपाटीकरण, बांध बंदिस्ती, सिंचनाची सोय, भांडवली गुंतवणूक केली, तरच शेती लाभाची ठरेल, अशी त्यांची धारणा होती. जलसिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्याशिवाय किफायतशीर शेती होऊ शकत नाही. यासाठी त्यांनी बहुउद्देशीय प्रकल्पांची उभारणी केली. आंतरराज्य नदी जोड प्रकल्पाची कल्पनाही त्या काळात बाबासाहेबांनी मांडली. कुशल श्रम आणि प्रगत तंत्रज्ञानाने शेती सुधारली जाऊ शकते, हे त्यांचे म्हणणे होते. कृषी क्षेत्राचे यांत्रिकीकरण करूनच विकास साधला जाऊ शकतो किंबहुना यंत्राच्या साह्याने शेती केल्याशिवाय उत्पादनात वाढ होणे शक्य नाही, ही त्यांची मूलभूत विचारदृष्टी होती. शासकीय समाजवादाचे धोरण अवलंबत, सामुदायिक शेतीकडे वळावे लागेल, हा संदेशही ते देतात

श्रीइंग्रज खैरमोडे लिहितात की जॉर्ज बर्नाड शॉने . लोकांबद्दल एके ठिकाणी उद्गार काढले होते की इंग्रज जे कांही करतो ते एखाद्या तत्त्वाचा आधार घेऊनच करतो तो तुमच्याबरोबर लढाई करतो, तेव्हां तो राष्ट्रवादाच्या तत्त्वांचा आधार घेतोतो तुम्हाला लुटतो ., तेव्हां व्यापारी तत्त्वांचा आधार घेतो, तुम्हाला गुलाम करतो, तेव्हा तो साम्राज्याच्या तत्त्वांचा आधार घेतोतो राजाला पाठिंबा . देतो, तेव्हां तो राजनिष्ठेच्या तत्त्वांचा आधार घेतोआणि तो . राजाचा शीरच्छेद करतो, तेव्हा तो लोकशाहीच्या तत्त्वांचा आधार घेतोहे उद्गार थोड्याबहुत प्रमाणात . नाही लागू करता येतीलहिंदुसमाजातील श्रेष्ठ वर्णीयां, कारण धार्मिक सुधारणांना ते विरोध करतात, ते समाजातील ईश्वर निर्मित चातुर्वण्याचे रक्षण करण्यासाठी, (हक्कांसाठी ( भांडणाऱ्या दलित पुढाऱ्ांना विरोध करतात ते राष्ट्राची अभंगता सुरक्षित ठेवण्यासाठी, आणि दलित वर्गांना ते परोपरीने छळतात, ते स्वतःच्या वर्गाची, ही छळण्याची मक्तेदारी भूतकाळावरून पुढे भविष्यकाळांत चालू राहावी म्हणून! अशा परस्थितीत डॉबाबासाहेब आंबेडकर यांनी . समस्त शेतकरी कामगार शोषित पिडीत समूह अशा सर्वांना शेतकऱ्यांच्या .त्यांनी कायद्याच्या माध्यमातून संरक्षण दिले समस्या सोडविण्यासाठी आणि अन्यायाला कामगारांच्या बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहमी .वाचा फोडण्यासाठी डॉ लढा दिला.

**संदर्भ :**


१) पवार दया ,(संपादक)*डॉबाबासाहेब आंबेडकर गौरव . ,ग्रंथ* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , १९९३ डिसेंबर २५ ,प्रथम आवृत्ती ,मुंबई

२) लोकराज्य *डॉबाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी . ,विशेषांक*एप्रिल १९९१

३) लोकसत्ता *डॉआंबेडकरांकडून पाणी., वीज व शेतीचा सूक्ष्म विचार'* एप्रिल २० , २०१६

४) थोरात सुखदेव ,लोकसत्ता ,*राष्ट्र उभारणीत डॉ. आंबेडकरांचे योगदान* ,७ डिसेंबर २०१८

५) प्रा, सतीश यादव.डॉ.मटा विशेष लेखः *शेतकऱ्यांचे बाबासाहेब*, ६ डिसेंबर २०२२

६) सचिन होळकर ,ॲग्रो विशेष, बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आजही मार्गदर्शक, ६ डिसेंबर २०२२

७) धनंजय कीर ,*डॉ,बाबासाहेब आंबेडकर.* पॉप्युलर प्रकाशन २००३ तिसरी आवृत्ती ,मुंबई ,

८) लोकराज्य ,माहिती व जनसंपर्क महासंचानालय , २०१५ डिसेंबर ,महाराष्ट्र शासन

९) लोकराज्य ,माहिती व जनसंपर्क महासंचानालय , २०१६ एप्रिल ,महाराष्ट्र शासन

१०) लोकराज्य ,माहिती व जनसंपर्क महासंचानालय , २०१७ एप्रिल ,महाराष्ट्र शासन




**प्रा. महादेव श्रावण गायकवाड.**